# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ: शै.प्रवेश/४२२४ दिनांक : १५/१०/२०१८

**तातडीचे/महत्वाचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विषय - ''डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता'' योजनेंतर्गत नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी परवानगी देण्याबाबतची कार्यपध्दती.

संदर्भ - शासन निर्णय दि. ०९/१०/२०१८.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांस अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, शासनाने डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता'' योजनेंतर्गत नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी परवानगी देण्याबाबतच्या कार्यपध्दतीसंदर्भात उपरोक्त शासन निर्णयाव्दारे निर्देश दिलेले आहेत. सोबत शासन निर्णयाची प्रत आपल्या पुढील कार्यवाहीसाठी जोडत आहोत.

कळावे,

आपला,
15/10/2018
उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत :— माहितीसाठी

मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक दिनांक: 11 OCT 2018
आवक क्रमांक : पीव्हीसी/4415
जावक दिनांक : 11/10/18

**डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी परवानगी देण्याबाबतची कार्यपद्धती...**

Ph.D. M.Phil Unit
Inward No.: 12034
Date: 12/10/2018

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२४९/तांशि-४,**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०९ ऑक्टोबर, २०१८

**<u>वाचा :</u>** १) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३.१०.२०१६

२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीबीसी-१०/२०१७/प्र.क्र.१९६/मावक, दिनांक ०४.१०.२०१७

३) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१७ /प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७.१०.२०१७

४) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.४०७/तांशि-४, दि.२२.०२.२०१८.

५) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८ /प्र.क्र.१८५/तांशि-४, दि.१८.०६.२०१८

६) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२४९/तांशि-४, दिनांक १३ जुलै, २०१८

७) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२४९/तांशि-४, दिनांक १० ऑगस्ट, २०१८

८) मा. मंत्री (महसूल, मदत व पुर्नवसन, सार्वजनिक बांधकाम) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८/०८/२०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीतील निर्णय

**<u>प्रस्तावना</u> :-**

डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता वसतिगृहाच्या सुविधा जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात याकरीता शासकीय /स्थानिक संस्था/ मंडळ यांच्या मालकीच्या इमारती नोंदणीकृत संस्थांना भाडयाने देण्याची योजना संदर्भ क्र.६ येथील दिनांक १३ जुलै,२०१८ च्या शासन निर्णयान्वये अंमलात आणली आहे. तसेच या वसतिगृहाच्या व्यवस्थापनाकरीता व विद्यार्थ्यांच्या प्रवेशाकरीता संदर्भ क्र.७ येथील दिनांक १० ऑगस्ट, २०१८ च्या शासन निर्णयान्वये नियमावली लागू करण्यात आली आहे. संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णय दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ मधील परिच्छेद-३ मध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता नोंदणीकृत संस्था वसतिगृह चालविण्यासाठी तयार असल्यास सदर योजनांची अंमलबजावणी करण्याकरीता काही अटी व शर्ती विहित करण्यात आल्या आहेत.

२. मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक २८/८/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत, एखादी नोंदणीकृत संस्था आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्वतःच्या इमारतीमध्ये वसतिगृह चालविण्याकरीता तयार असल्यास त्याकरीता दिनांक १३/७/२०१८ व दिनांक १० ऑगस्ट,२०१८ च्या च्या शासन निर्णयामधील विहित केलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात येऊन सदर संस्थेस वसतिगृह चालू करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यास अनुसरुन आवश्यक ते शासन आदेश निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील मुंबई / पुणे महानगर क्षेत्रामध्ये अथवा अन्य जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी शासकीय व इतर इमारती डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत वसतिगृह चालविण्यासाठी भाडयाने देण्याकरीता उपलब्ध नसतील तर अशा ठिकाणी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत नोंदणीकृत संस्थांना आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्वतःच्या इमारतीमध्ये वसतिगृह चालविण्याकरीता परवानगी देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. राज्यातील जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता उपलब्ध असलेली वसतिगृहाची व्यवस्था विचारात घेऊन गरजेनुरुप जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी केवळ एक वसतिगृह चालविण्यासाठी नोंदणीकृत संस्थांची निवड करण्याकरीता जाहिरात देऊन निवड प्रक्रिया राबविण्याचे अधिकार संदर्भ क्र.६ येथील दिनांक १३/७/२०१८ च्या शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस राहतील. त्याप्रमाणे जाहिरात देवून गुणवत्तेनुसार संस्थांची निवड करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी तातडीने करावी. ही निवड करण्यापूर्वी संबंधित कार्यकारी अभियंता व त्या जिल्हयातील शासकीय तंत्रनिकेतनांमधील प्राचार्य / विभाग प्रमुख (स्थापत्य) यांनी संयुक्तपणे अर्ज केलेल्या संस्थेच्या इमारतीची प्रत्यक्ष पाहणी करुन सदर इमारत वसतिगृहासाठी उपयुक्त ठरु शकते किंवा कसे याचा सविस्तर अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करणे आवश्यक राहिल.

३. संस्थेची निवड करताना एका संस्थेची एकच इमारत आवश्यक राहिल. तसेच अपवादात्मक परिस्थितीत एकापेक्षा जास्त संस्थांची वसतिगृहासाठी निवड करावयाची असल्यास योग्य त्या समर्थनासह प्रस्ताव संचालक, तंत्र शिक्षण यांजकडे सादर करणे आवश्यक राहिल.

४. या व्यतिरिक्त संदर्भ क्र.६ येथील दिनांक १३/७/२०१८ च्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्ती आणि सर्वसाधारण कार्यपध्दती नोंदणीकृत संस्थांची निवड करण्याकरीता लागू राहिल. तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत नोंदणीकृत संस्थांनी चालविलेल्या अशा वसतिगृहाच्या व्यवस्थापनाकरीता व विद्यार्थ्यांच्या प्रवेशाकरीता शासन निर्णय, दिनांक १० ऑगस्ट, २०१८ अन्वये तयार करण्यात आलेली नियमावली लागू राहील.

५. निवड केलेल्या नोंदणीकृत संस्थेस हे वसतिगृह चालविण्यासाठी कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देण्यात येणार नाही. वसतिगृहामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणाऱ्या शुल्कामधून वसतिगृहाचा सर्व प्रकारचा खर्च भागविण्याची जबाबदारी संबंधित नोंदणीकृत संस्थेची राहिल.

६. या योजनेसाठी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१००९१४३३०४५८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee2301144 8b7fc64d138630b9c76ae7a2, cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2018.10.09 14:46:23 +05'30'

( संजय औ.धारुरकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
५. सर्व सन्माननीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य.
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव , सर्व प्रशासनिक विभाग,मंत्रालय,मुंबई
७. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नशिक
९. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. कुलसचिव, सर्व (कृषी/अकृषी) विद्यापीठे
१८. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगाव, जि.रायगड
१९. कुलसचिव, महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

२०. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व),मुंबई ४०००५१
२१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व) (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
२२. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर
२५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर
२६. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
२७. सह/उप सचिचव (मशि-२/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
२८. अवर सचिव (तांशि-३/विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
२९. कक्ष अधिकारी (मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३०. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
३१. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
३२. निवड नस्ती (तांशि-४).